दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
बीड महाराष्ट्र | सोमवार , 14 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 124 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

पावसाअभावी आष्टी, पाटोदा, शिरूर कासार तालुक्यांतील खरीप पिके वाया; शेतकऱ्यांवर असमानी संकट

सुरेश धस जिवंत आहे शेतकऱ्यांनी घाबरू नये : आ. सुरेश धस यांची ग्वाही

■ आष्टी (प्रतिनिधी) :

पावसाळा संपत आला असतानाही आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांत खरीप हंगामातील पिके पावसाने पाठ फिरवल्याने वाया गेली असून, शेतकऱ्यांवर अस्मानी संकट ओढवले आहे.या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.तर शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये सुरेश धस जिवंत असून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही हेक्टरी अनुदान मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही आ. धस यांनी दिली.

आष्टी तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात एकूण ९७ हजार ७६७ हेक्टर क्षेत्रापैकी ६८ हजार ५५० हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आली ज्यामध्ये या वर्षी सोयाबीन 38 हजार हेक्टर, उडीद 17 हजार हेक्टर, मूग 1 हजार 900 हेक्टर,मका 8 हजार हेक्टर,बाजरी 6 हजार 300 हेक्टर, कापूस 5 हजार 500 हेक्टर तूर 15 हजार 500 हेक्टर या प्रमाणे तसेच पाटोदा तालुक्यामध्ये एकूण 58 हजार 913 हेक्टर क्षेत्रात सोयाबीन 51 हजार 487 हेक्टर, तूर 2 हजार 974 हेक्टर,उडीद 1 हजार 595 हेक्टर, कापूस 1 हजार 597 हेक्टर, बाजरी 1260 हेक्टर तर शिरूर कासार तालुक्यात 47 हजार 544 हेक्टर क्षेत्रामध्ये सोयाबीन 7 हजार 240 हेक्टर, कापूस 29 हजार, 202 हेक्टर, उडीद 2 हजार 392 हेक्टर, मूग 786 हेक्टर, बाजरी 1 हजार 509 हेक्टर, मका 557 हेक्टर, तूर 5 हजार 746 हेक्टर क्षेत्रातील पेरणी झालेली आहे मात्र पावसाअभावी आष्टी पाटोदा शिरूर कासार तालुक्यातील सर्व पिके वाया गेली असून येथील फळबागा वाचवण्यासाठी फळबाग धारक शेतकऱ्यांची फळबागांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी अनुदान देण्याची मागणी समोर येत आहे. तिन्ही तालुक्यांमध्ये सोयाबीन, मूग, उडीद, मका, कापूस,बाजरी,आणि तूर या प्रमुख खरीप पिके पावसाअभावी वाया गेल्याने पेरणीसाठी केलेला खर्चही वसूल होण्याची परिस्थिती राहिली नसल्याचे चित्र आहे.

सरसकट हेक्टरी अनुदान मिळवून देऊ आ. सुरेश धस

■ दरम्यान, २० ते ३० सप्टेंबरदरम्यान पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मात्र, पावसाने पाठ फिरविल्याने शेतकऱ्यांनी हतबल होऊन इतरत्र कामाला जाण्याचा विचार करू नये. "आता कसं होईल, काय होईल, या चिंतेत शेतकऱ्यांनी राहू नये. सुरेश धस जिवंत आहे. शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये. जे हेक्टरी अनुदान मिळेल, ते सरसकट मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. विनाकारण मनात भीती बाळगू नका," असे आवाहन आ. सुरेश धस यांनी केले आहे.शेतकऱ्यांनी संकटाच्या काळात धीर न सोडता पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाकडून शेतकऱ्यांना हेक्टरी अनुदान मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाहीही आ. धस यांनी दिली.

जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर!

■ आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांत पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याने त्याचा थेट परिणाम जनावरांच्या चाऱ्यावर झाला आहे. दुभत्या जनावरांची संख्या अधिक असलेल्या तसेच जोडधंदा म्हणून दुध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हिरवा चारा आणि कडबा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांची चिंता वाढली आहे. दुध व्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उत्पन्नावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने चारा डेपो सुरू करून पशुपालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

बीड जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्र वाटपासाठी विशेष शिबिरांचा धडाका

एका दिवसात ९८ अर्ज प्राप्त, ३६ जणांना प्रमाणपत्र मंजूर

■ बीड प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार, बीड जिल्ह्यात मराठा समाजातील पात्र नागरिकांना 'कुणबी' जात प्रमाणपत्रे वितरित करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने १० ते १७ सप्टेंबर या कालावधीत 'कुणबी विशेष शिबिरांचे' आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेला जिल्ह्यात नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, आज (११ सप्टेंबर) रोजीची जिल्ह्याची अधिकृत आकडेवारी समोर आली आहे. आज एका दिवसात जिल्ह्यात ९८ अर्ज प्राप्त झाले असून, पडताळणीनंतर त्यापैकी ३६ अर्जांना मंजुरी देण्यात आली आहे.

प्राप्त झालेल्या अधिकृत अहवालानुसार, बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये आज एकूण १८ विशेष शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांच्या माध्यमातून प्रशासनाकडे कुणबी प्रमाणपत्रासाठी नागरिकांनी अर्ज दाखल केले.

११ सप्टेंबर रोजीची जिल्ह्याची एकूण आकडेवारी खालीलप्रमाणे:

- **एकूण आयोजित शिबिरे: १८**
- **प्राप्त झालेले एकूण अर्ज: ९८ (यामध्ये समितीमार्फत ७९ तर गॅझेटमार्फत १९ अर्ज प्राप्त झाले आहेत.)**
- **मान्य करण्यात आलेले (मंजूर) अर्ज: ३६ (हे सर्व ३६ अर्ज समितीमार्फत मान्य करण्यात आले आहेत.)**
- **नाकारलेले (नामंजूर) अर्ज: १८ (त्रुटींमुळे १६ समिती आणि २ गॅझेटकडील अर्ज नाकारण्यात आले आहेत.)**
- **प्रलंबित अर्ज: २८ (समितीचे २७ आणि गॅझेटचा १ अर्ज प्रलंबित आहे.)**
- **आष्टी आणि पाटोदा तालुक्यात सर्वाधिक प्रतिसाद**
- **तालुकानिहाय विचार केल्यास, सर्वाधिक अर्ज पाटोदा उपविभागात (पाटोदा आणि आष्टी तालुके) प्राप्त झाले आहेत. आष्टी तालुक्यात ३ शिबिरांच्या माध्यमातून सर्वाधिक २७ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १७ अर्जांना तत्काळ मंजुरी देण्यात आली आहे, तर १० अर्ज प्रलंबित आहेत. त्याखालोखाल पाटोदा तालुक्यात २३ अर्ज प्राप्त झाले असून ६ अर्जांना मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय, शिरूर (११ अर्ज), अंबेजोगाई (१६ अर्ज), केज (१६ अर्ज) आणि माजलगाव (४ अर्ज) या तालुक्यांमध्येही शिबिरांचे कामकाज वेगात सुरू आहे.**

अर्ज प्रलंबित राहण्याची कारणे:

■ **प्रलंबित राहिलेल्या २८ अर्जांबाबत प्रशासनाने अहवालात स्पष्ट केले आहे की, बहुतांश अर्ज हे 'प्रस्ताव पूर्ण नसल्याने, कागदपत्रांच्या आधारे प्रलंबित किंवा कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यास वेळ लागत असल्याने' प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यास त्यांच्या अर्जांवर तातडीने कार्यवाही केली जाईल. मराठा समाजातील ज्या नागरिकांच्या जुन्या नोंदी 'कुणबी' म्हणून सापडल्या आहेत, त्यांनी या विशेष शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि आपली आवश्यक कागदपत्रे सादर करून प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावीत, असे आवाहन महसूल प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हे विशेष शिबीर १७ सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यात सुरू राहणार आहे.**

विजांचा कडकडाटासह मुसळधार पाऊस ! हवामान खात्याचा 'या' जिल्ह्यांना इशारा

■ मुंबई वृत्तसंस्था

राज्यभरात आज गणेशोत्सवाचा मोठा उत्साह बघायला मिळत असताना पावसानं पुन्हा एकदा जोरदार पावसाची शक्यता आहे. तर मुंबई ठाणे, कोकणापासून ते विदर्भापर्यंत अनेक भागांमध्ये पावसाच्या सरी कोसळत आहे. कुठे रस्ते जलमय झालेत, कुठे गणेश मंडपामध्ये पाणी शिरलं, तर विदर्भ मराठवाड्यामध्ये याच पावसामुळे करपण्याच्या मार्गावर असलेल्या पिकांना जीवदान मिळाल्याने पावसाचं सावट असलं तरी बळीराजासाठी हा पाऊस दिलासा देणारा ठरला आहे. दरम्यान राज्यात हवामान खात्याने आज १४ सप्टेंबर आणि उद्या १५ सप्टेंबरला अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

राज्यात मुसळधार ! हवामान खात्याचा इशारा

उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्रातील काही भागांत अतिमुसळधार ते अत्यंत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे. १४ सप्टेंबरला कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून, उत्तर किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहू शकतात. मध्य महाराष्ट्रातही बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता असून, तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस होण्याचा अंदाज आहे.

१५ सप्टेंबरलाही मुसळधार सरी बरसण्याची शक्यता आहे. कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रातील काही भागांत तसेच मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस होऊ शकतो. विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. दरम्यान, उत्तर महाराष्ट्रातील काही भागांसह नाशिक घाट परिसरात पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता असून, काही जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई,ठाणे, रायगड, पुणे, सातारा, बीड, हिंगोली आणि नागपूरसह काही भागांतही पावसाची शक्यता कायम आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या तयारीसाठी आणि गणेशमूर्तींच्या आगमन-विसर्जनासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'या' ठिकाणी विजांचा कडकडाटासह पावसाच्या सरी

■ **जळगाव, नाशिक, पुणे घाटमाथा, छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथील काही भागांतही मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ४०-५० किमी वेगाच्या सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा आणि वाशीम यांसारख्या भागांतही अशाच प्रकारचा मुसळधार पाऊस आणि मेघगर्जनेचा इशारा देण्यात आला होता. सोबतच गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांत सोमवारी अनेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. एक-दोन ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा इशारा आहे.**

गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मुंबईत पावसाची हजेरी! हलका-मध्यम पाऊस, वाऱ्याचा जोर

■ मुंबई : वृत्तसंस्था

गणरायाच्या आगमनाने मुंबईत गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असतानाच शहरात पावसानेही हजेरी लावली आहे. आज, १४ सप्टेंबर रोजी मुंबईत अनेक भागांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. काही ठिकाणी वाऱ्याचे झोतही जाणवत असून, ढगाळ वातावरण कायम आहे. मात्र, मुंबई शहर आणि उपनगरांसाठी आज कोणताही मोठा हवामान इशारा जारी करण्यात आलेला नाही. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मुंबईत मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना होत आहे. त्यामुळे रस्त्यांवर नागरिकांची मोठी गर्दी असून, अनेक ठिकाणी मिरवणुका आणि स्वागत सोहळे आयोजित करण्यात आले आहेत. अशा परिस्थितीत पावसामुळे मंडळांच्या तयारीवर आणि नागरिकांच्या हालचालींवर काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता आहे.

मुंबईत पावसाची शक्यता कायम

हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबईत आज दिवसभर ढगाळ वातावरणासह पावसाच्या सरी पडण्याची शक्यता आहे. काही भागांत पावसाचा जोर वाढू शकतो, तर काही ठिकाणी पावसात विश्रांतीही मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे गणेशभक्तांनी घराबाहेर पडताना हवामानाची स्थिती लक्षात घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सध्या मुंबईसाठी मोठा इशारा नसला, तरी शहराच्या आसपासच्या भागात हवामानाची परिस्थिती तुलनेने अधिक सक्रिय आहे. ठाणे आणि पालघर परिसरासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे या भागांत मुसळधार पावसासोबत मेघगर्जना आणि वाऱ्याचा जोर जाणवण्याची शक्यता आहे.

गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतील रस्त्यांवर मोठी गर्दी होत असल्याने पावसामुळे वाहतुकीचा वेग मंदावण्याची शक्यता आहे. सार्वजनिक मंडळांच्या मिरवणुका, गणेश आगमन सोहळे आणि दर्शनासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे महत्त्वाचे आहे. विशेषतः वीजेचा कडकडाट, जोरदार वारे किंवा अचानक पावसाचा जोर वाढल्यास नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. समुद्रकिनारी जाणाऱ्या नागरिकांनीही विशेष खबरदारी घ्यावी. दरम्यान, मुंबईत आज पाऊस सुरू असला तरी गणेशोत्सवाच्या उत्साहावर त्याचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. बाप्पाच्या आगमनासोबत मुंबईकरांवर वरुणराजाचीही कृपादृष्टी कायम राहणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

संपादकीय

देवाभाऊंचा जनोत्सव

राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री अशा मान्यवरांचे वाढदिवस सर्वत्र नेहमीच उत्साहात साजरे केले जातात. त्यातच ते गाव त्यांची जन्मभूमी किंवा कर्मभूमी असेल, तर मग विचारायलाच नको. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर शहरातच जन्मले, इथेच शिकले आणि नागपुरातूनच त्यांनी राजकारणालाही सुरुवात केली. याच शहरातल्या पश्चिम दक्षिण नागपूर विधानसभा क्षेत्रातून ते निवडून येतात. ही त्यांची सहावी टर्म आहे. महाराष्ट्राचे गठन झाले, त्यापूर्वी नागपूर ही जुन्या मध्य प्रांताची राजधानी होती. मात्र तेव्हापासूनच नागपूरचा नागरिक असलेला कोणी मुख्यमंत्री झाला नव्हता. मात्र ऑक्टोबर २०१४ मध्ये सर्वप्रथम देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने नागपूरला मुख्यमंत्रीपद लाभले होते. तेव्हापासूनच महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू म्हणून फडणवीस ओळखले जातात. त्यांचा तसा दबदबा देखील आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांचा छप्पन्नावा वाढदिवस या आठवड्यात बुधवारी म्हणजेच २२ जुलैला होता. त्यानिमित्ताने नागपुरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात एक महायज्ञ होता, सायकल आणि छत्री वाटप होते आणि इतर कार्यक्रमांचीही रेलचेल होती. मुख्यमंत्री फडणवीसांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दक्षिण पश्चिम नागपूर आणि पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्र भाजपच्या वतीने रामनगर चौकातील श्रीराम मंदिरात श्री लक्ष्मी नृसिंह महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. या महायज्ञात ५६ समाजातील दांपत्यांनी वैदिक विधीनुसार समिधा अर्पण करून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उत्तम दीर्घायुरारोग्य आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी सामूहिक प्रार्थना केली. नागपूरचे माजी महापौर संदीप जोशी यांच्या नेतृत्वात झालेल्या या महायज्ञाचा शुभारंभ भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाला. यज्ञ यागातील सर्व धार्मिक विधी वैदिक परंपरेनुसार पार पडले. वेदमंत्रांचा मंगल घोष, भजनांचा निनाद अशा भक्तिमय वातावरणाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता. महाआरती आणि महाप्रसादाने या धार्मिक सोहळ्याची सांगता झाली होती.

मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात महाराज अभियान शिबीर आयोजित केले होते. यावेळी २२० बेघरांना मालकी हक्काचे पट्टे, ४०० जणांना स्वामित्व हक्क प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच ९८ शेतमजूर महिलांना शेतकरी प्रमाणपत्राचेही वाटप करण्यात आले. बेलतरोडी येथील पाच मंदिर मैदानावर झालेल्या या शिबिराला मार्गदर्शन करताना आम्ही प्रत्येकाला आदर्श प्रशासनाचा प्रत्येक देऊ अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

राज्य सफाई कामगार आयोग आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सफाई कामगारांना सहा कोटी रुपयांच्या रिक्षा सायकली आणि जीवन उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री तुमच्याबाबत सकारात्मक आहेत. नागपुरात सफाई कामगारांना लवकरच घरकुले दिली जातील याची खात्री देखील बावनकुळे यांनी यावेळी दिली. यावेळी सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष सतीश डागोर,आमदार मोहन मते, आमदार परिणय फुके, महापौर नीता ठाकरे, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी प्रभृती उपस्थित होते. याच निमित्ताने भाजप व्यापारी आघाडीतर्फे प्रतापनगर चौकातील ठिय्यावर बसणाऱ्या बांधकाम कामगारांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. याच निमित्ताने खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने १५६ भजनी मंडळांकडून विठ्ठल भक्तीचा जागर करण्यात आला. यावेळी भजनी मंडळ स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार अनिल सोले यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त गांधीनगर येथे माजी महापौर वसुंधरा मसूरकर यांच्या नेतृत्वात हनुमान मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. यात परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त नागपुरात दिवसभर ठीकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले आणि सर्वांनीच नागपूरकरांचे लाडके देवाभाऊ फडणवीस यांच्या दीर्घायुरारोग्यासाठी परमेश्वर चरणी प्रार्थना केली.

पत्रकार आदिनाथ ठोंबरे वाढदिवस विशेष

***पत्रकारिता म्हणजे केवळ घडलेल्या घटनांची नोंद नव्हे तर त्या घटनांमागचा समाजस्पंदनांचा अर्थ ओळखून तो वाचकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण वृत्तांकनातून ही जबाबदारी समर्थपणे निभावत, 'अतुल्य महाराष्ट्र'च्या पत्रकारितेला स्वतंत्र वलय प्राप्त करून देणारे आमचे प्रतिनिधी म्हणजे आदिनाथजी ठोंबरे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या पत्रकारितेचा हा कर्तृत्ववेध...**

शब्दांना धार, वृत्तांकनाला वेगळी दृष्टी! घटनांच्या गर्दीतून आशय शोधणारा पत्रकार!

वृत्तपत्र हे केवळ कागदावर उमटणाऱ्या अक्षरांचे माध्यम नसते; ते समाजाच्या स्पंदनांचा दस्तऐवज असते. गावाच्या चौकापासून शहराच्या गजबजलेल्या रस्त्यापर्यंत, शेतकऱ्याच्या बांधापासून विद्यार्थ्यांच्या यशापर्यंत आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांपासून सामाजिक परिवर्तनाच्या घटनांपर्यंत समाजजीवनातील प्रत्येक हालचालीला शब्दरूप देण्याचे काम वृत्तपत्र करत असते. या प्रक्रियेत प्रतिनिधी हा केवळ वार्ताहर नसतो; तो त्या परिसराचा डोळा, कान आणि समाजमनाचा संवेदनशील दुवा असतो. दैनिक 'अतुल्य महाराष्ट्र' च्या पत्रकारितेच्या प्रवासात असेच एक विश्वासार्ह नाव म्हणून आदिनाथजी ठोंबरे यांच्याकडे पाहता येते. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करताना केवळ एका प्रतिनिधीच्या कार्याचा गौरव करण्यापेक्षा, त्यांच्या पत्रकारितेने वृत्तपत्राच्या वाटचालीत निर्माण केलेल्या वेगळ्या ठशाचा मागोवा घेणे अधिक महत्त्वाचे वाटते.

पत्रकारिता ही दिसणाऱ्या घटनेची नोंद घेण्यापुरती मर्यादित नसते. एखादी घटना सर्वांच्या डोळ्यांसमोर घडते; परंतु त्यातील बातमीमूल्य ओळखणे, तिच्यामागचा सामाजिक संदर्भ जाणून घेणे आणि ती वाचकांसमोर नेमक्या, परिणामकारक व वाचनीय पद्धतीने मांडणे, ही प्रतिनिधीच्या कामाची खरी कसोटी असते.

आदिनाथजींच्या वृत्तांकनाची हीच वैशिष्ट्यपूर्ण बाजू आहे. त्यांच्या बातमीत केवळ 'काय घडले?' याचे उत्तर नसते; तर त्या घटनेचा समाजाशी असलेला संबंध जाणून घेण्याची दृष्टी दिसते. सामान्य वाटणाऱ्या घटनेतून वेगळा आशय शोधण्याची त्यांची हातोटी त्यांच्या लेखनाला स्वतंत्र स्वरूप देते. ज्या घटनेकडे एखादा सामान्य वाचक क्षणभर पाहून पुढे निघून जाईल, तिथे पत्रकाराची नजर थांबते—निरीक्षण करते, प्रश्न विचारते आणि त्या घटनेला शब्द देण्याचा प्रयत्न करते. आदिनाथजींच्या लेखनात ही 'थांबून पाहण्याची दृष्टी' प्रकर्षाने जाणवते.

स्थानिक मातीपासून व्यापक समाजमनापर्यंत... आदिनाथजींची पत्रकारिता!

त्यांच्या वृत्तांकनात स्थानिक मातीचा गंध आहे; मात्र विषय मांडताना दृष्टिकोन व्यापक आहे. गावातील प्रश्न असो, शेतकऱ्याची अडचण असो, विद्यार्थ्यांचे यश असो, सामाजिक उपक्रम असो किंवा एखाद्या व्यक्तीच्या संघर्षाची कहाणी—त्यातील वेगळेपण वाचकांसमोर आणण्याची त्यांची शैली लक्षवेधी ठरते. त्यांच्या बातम्या केवळ माहिती देत नाहीत; त्या वाचकाला त्या घटनेशी जोडतात. शब्दांत सत्य, मांडणीत संवेदना आणि पत्रकारितेत वेगळेपण ही त्यांच्या वृत्तांकनाची ओळख म्हणावी लागेल. याच कारणामुळे आदिनाथजींच्या पत्रकारितेला 'अतुल्य महाराष्ट्र'मध्ये एक विशिष्ट वलय प्राप्त झाले आहे. त्यांनी केवळ बातम्या पाठवण्याचे कर्तव्य पार पाडले नाही, तर आपल्या लेखनातून वृत्तपत्राच्या आशयाला आणि स्थानिक प्रतिनिधित्वाला वेगळी ओळख देण्याचा प्रयत्न केला आहे.

'अतुल्य महाराष्ट्र'च्या यशप्रवासातील एक प्रभावी लेखणी!

एखाद्या वृत्तपत्राची लोकप्रियता केवळ त्याच्या नावामुळे वाढत नाही. त्यामागे असते दर्जेदार बातमीची निवड, विश्वासार्ह वृत्तांकन, भाषेची सहजता, विषयाचे भान आणि वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी मांडणी. 'अतुल्य महाराष्ट्र'च्या वाढत्या वाचकविश्वात आदिनाथजींच्या वैशिष्ट्यपूर्ण वृत्तांकनाचा वाटा निश्चितच उल्लेखनीय आहे.

त्यांच्या लिखाणामुळे अनेक स्थानिक घटना व्यापक वाचकांपर्यंत पोहोचल्या, काही विषयांना चर्चेचे व्यासपीठ मिळाले, काही प्रश्नांकडे लक्ष वेधले गेले आणि अनेक सकारात्मक उपक्रमांना प्रसिद्धी मिळाली.

घर-संसार, शेती आणि पत्रकारितेचा समतोल

आदिनाथजींच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे घरची जबाबदारी, शेती, प्रपंच आणि परमार्थ सांभाळत पत्रकारितेची जबाबदारी पार पाडण्याची त्यांची वृत्ती. एका बाजूला कुटुंबाची काळजी, दुसऱ्या बाजूला शेतीशी जोडलेली नाळ, सामाजिक व आध्यात्मिक जीवनातील सहभाग आणि त्याचवेळी परिसरातील घडामोडींचा वेध घेत वृत्तांकनाची जबाबदारी—या साऱ्या भूमिका ते समतोलाने निभावत आहेत.

पत्रकारितेला ठरावीक वेळ नसतो. एखादी बातमी कधी, कुठे आणि कोणत्या परिस्थितीत समोर येईल, याचे गणित नसते. त्यामुळे अनेक जबाबदाऱ्यांमधून वेळ काढून माहिती मिळवणे, तिचा मागोवा घेणे आणि ती वाचकांपर्यंत पोहोचवणे, यामागे केवळ लेखणी नाही, तर कामाप्रती असलेली निष्ठा आणि वेळेचे भान असते.

लेखणीची ताकद आणि पत्रकारितेची स्वतंत्र ओळख!

त्यांच्या पत्रकारितेत बातमीकडे पाहण्याची स्वतंत्र दृष्टी जाणवते. शब्दांची अनावश्यक आतषबाजी न करता आशयाला महत्त्व देणे, साध्या भाषेत प्रभाव निर्माण करणे आणि स्थानिक विषयाला वाचनीय स्वरूप देणे, ही त्यांच्या लेखनशैलीची जमेची बाजू म्हणावी लागेल. बातमीच्या पलीकडचा अर्थ शोधणारा आदिनाथ म्हणून त्यांची ओळख याच वृत्तीमुळे अधिक ठळक होते.

पत्रकाराची लेखणी ही समाजासाठी आरशासारखी असते. त्या आरशात समाजाला स्वतःचे प्रतिबिंब दिसते. मात्र तो आरसा स्वच्छ आणि पारदर्शक असेल, तरच प्रतिबिंब स्पष्ट दिसते. आदिनाथजींच्या पत्रकारितेत ही पारदर्शकता, विषयाची जाण आणि मांडणीची सहजता यांचा संगम दिसतो.

त्यामुळेच त्यांच्या चांगल्या वृत्तांकनातून केवळ एक प्रतिनिधी पुढे येत नाही; त्याचबरोबर 'अतुल्य महाराष्ट्र'ची विश्वासार्हताही अधिक दृढ होत जाते.

कारण वृत्तपत्राचा खरा विस्तार त्याच्या पानांच्या संख्येने होत नाही; तो वाचकांच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासाने होतो. त्या विश्वासाची पायाभरणी करणाऱ्या प्रत्येक प्रतिनिधीचे योगदान मोलाचे असते.

आदिनाथजी ठोंबरे हे अशाच कार्यतत्पर प्रतिनिधींपैकी एक आहेत. वृत्तांकनाच्या वाटेवर कर्तृत्वाची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या त्यांच्या प्रवासाला आज वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देताना, त्यांच्या पत्रकारितेतील सातत्य आणि वेगळेपणाचे विशेष कौतुक वाटते. त्यांच्या पत्रकारितेचा प्रवास अजून मोठा व्हावा, अनुभवांची क्षितिजे विस्तारावीत, विषयाकडे पाहण्याची दृष्टी अधिक प्रगल्भ व्हावी आणि त्यांच्या लेखणीतून समाजातील अधिकाधिक प्रश्नांना, कर्तृत्वांना व सकारात्मक घटनांना प्रभावी व्यासपीठ मिळत राहावे, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक अपेक्षा. संपादक म्हणून आम्हाला त्यांच्या लेखणीकडून केवळ अधिक बातम्यांची अपेक्षा नाही; तर अधिक अर्थपूर्ण वृत्तांकनाची अपेक्षा आहे. कारण चांगली बातमी वाचकाला माहिती देते; पण उत्तम पत्रकारिता वाचकाला विचार करायला भाग पाडते. आदिनाथजींच्या लेखणीत ही दुसरी ताकद अधिकाधिक विकसित होत राहो. त्यांच्या शब्दांना सत्याची धार लाभो, मांडणीला अभ्यासाची खोली लाभो, वृत्तांकनाला व्यापक दृष्टी लाभो आणि प्रत्येक बातमीमागे समाजहिताचा विचार अधिक दृढ होत राहो. वृत्तांकनातून 'अतुल्य महाराष्ट्र'ला लाभलेले वेगळे वलय दिवसेंदिवस अधिक विस्तारत जावो आणि आदिनाथजींच्या कर्तृत्वामुळे या वृत्तपत्राची ओळख महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अधिक व्यापक होत जावो, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, आदिनाथजी ठोंबरे!

- **आपली लेखणी चालत राहो...**
- **शब्दांना अर्थ मिळत राहो...**
- **वृत्तांकनाला नवी उंची मिळत राहो...**
- **आणि आपल्या कर्तृत्वाच्या प्रत्येक नव्या पानासोबत 'अतुल्य महाराष्ट्र'च्या यशाची कहाणीही अधिक समृद्ध होत राहो!**

महाराष्ट्रासह देशात बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी!

संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा-अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते.नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते. कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत.देशात कोणत्याही देवी-देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते.याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले.श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते. गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती

आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ-लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर,भालचंद्र,गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते.त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो.भारत अनेक धर्मांनी, जाती-पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व असून वेगवेगळ्या देवी-देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा-अर्चना केली जाते.प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव.गणेशमुर्तींची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो.या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते.

■ **लेखक रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)

गणेशोत्सवासाठी नाशिक पोलिस सज्ज ! तब्बल 'इतके' गुन्हेगार हद्दपार

आज घरोघरी गणरायाचे आगमन होणार आहे. तर अनेक मंडळांच्या गणपतीचे आगमन मोठ्या थाटामाटात झाले आहे. गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित आणि निर्विघ्न वातावरणात पार पडावा यासाठी आता नाशिक पोलीस देखील सज्ज झाले आहे. शहरातील सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस आयुक्त संदिप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक शहर पोलीस आयुक्तालयामार्फत व्यापक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे नाशिक पोलिसांकडून कुलही स्वरूपाचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी ४०२ आरोपींवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

■ **४०२ आरोपींवर हद्दपारीची कारवाई**

उत्सवाच्या कालावधीत कोणत्याही व्यक्तीकडून शांततेचा भंग, सार्वजनिक उपद्रव अथवा कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचू नये, यासाठी हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. परिमंडळ एक आणि दोन अंतर्गत ४०२ आरोपींवर हद्दपारीची कारवाई.करण्यात आली आहे.

त्यांना २७ सप्टेंबरपर्यंत शहर परिसरात वास्तव्यास राहण्यास मनाई करण्यात आली आहे. परिमंडळ एक अंतर्गत १२७, तर परिमंडळ दोन अंतर्गत २७५ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ एक अंतर्गत विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमाणे : आडगाव ०७, पंचवटी २२, म्हसरूळ १०, भद्रकाली २४, सरकारवाडा ११, गंगापूर २२ आणि मुंबईनाका ३१, अशी परिमंडळ एकमध्ये एकूण १२७ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. पोलीस उपायुक्त किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ दोन अंतर्गत विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमाणे : अंबड ४०, सातपूर ५३, इंदिरानगर ३६, एमआयडीसी २५, नाशिकरोड ४२, उपनगर ४६ आणि देवळाली कॅम्प ३३, अशी परिमंडळ दोनमध्ये एकूण २७५ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

नाशिक शहर पोलिसांकडून विशेष पोलीस बंदोबस्त

दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर पोलिसांकडून विशेष पोलीस बंदोबस्त, वाहन व पायदळ गस्त, संवेदनशील ठिकाणी विशेष निगराणी, सीसीटीव्हीच्या माध्यमातून देखरेख आणि प्रतिबंधात्मक कारवाई यावर भर देण्यात आला आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध तात्काळ आणि कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी गणेशोत्सव शांततेत, सुरक्षिततेत व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नाशिक शहर पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दुष्काळ जाहीर करा; शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या!

शेतकरी संकटाच्या खाईत; शासनाने पंचनाम्यांच्या फेऱ्यात न अडकवता थेट मदतीचा हात द्यावा — सूर्यकांत मुंडे

परळी : पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. पिके धोक्यात आली असून शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन सरकारने दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. संचालक सूर्यकांत रामकृष्ण मुंडे यांनी केली आहे.

पावसाच्या लहरीपणाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. महागडी बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च करून शेतकऱ्यांनी पिके उभी केली; मात्र पावसाअभावी पिकांची अवस्था बिकट झाली आहे. उत्पन्नाची आशा मावळत असताना कर्जाचा डोंगर मात्र वाढत चालला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे.

शासनाने तातडीने दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करून गावागावांत पंचनामे करावेत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी आर्थिक मदत द्यावी, पीकविमा भरपाई मिळवून द्यावी तसेच कर्ज वसुलीला दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मुंडे यांनी केली आहे.

"शेतकरी अडचणीत असताना शासनाने कागदी घोडे नाचवून वेळकाढूपणा करू नये. दुष्काळाची परिस्थिती स्पष्ट दिसत असताना तातडीने निर्णय घेऊन मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये," असा इशाराही सूर्यकांत मुंडे यांनी दिला.

शेतकऱ्यांच्या संकटाची तीव्रता लक्षात घेऊन शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून ठोस मदत पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

बाळेवाडी येथील ग्रामसेवकाचा प्रताप! तहसीलचा आदेश असूनही मृत्यू नोंद लावण्यास टाळाटाळ; एका व्यक्तीच्या सांगण्यावरून विधवा महिलेचा छळ!

पीडित महिला कल्पना काळे यांचा गंभीर केला गंभीर आरोप, पंचायत समितीच्या कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

कडा । प्रतिनिधी

तालुक्यातील बाळेवाडी येथील पीडित महिला कल्पना अशोक काळे यांनी ग्रामसेवकावर गंभीर आरोप केले आहेत. तहसीलचा आदेश असूनही ग्रामसेवक विनाकारण मृत्यूची नोंद लावण्यास टाळाटाळ करत आहे. विनाकारण गावातील एका व्यक्तीच्या सांगण्यावरून विधवा महिलेचा छळ चालवला आहे. विनाकारण दुसऱ्याचे ऐकून नोंद लावत नाही, हा ग्रामसेवक लाचार आहे असा आरोप महिलेने केला आहे.

कल्पना काळे यांनी सांगितले की, त्यांच्या पतीचा काही महिन्यांपूर्वी निधन झाले असून मृत्यू प्रमाणपत्रासाठी तहसीलकडून सर्व कागदपत्रे देऊन आदेश मिळाल्यानंतरही ग्रामसेवकाने नोंद लावण्यास ताळाताळ करत आहे.आणि नोंद लावून घेत नाहीत.

कल्पना अशोक काळे म्हणाल्या, "माझा नवरा आता या जगात नाही, तरीही सरकारी नोंदीमध्ये त्यांचा मृत्यू नोंदविण्यासाठी ग्रामसेवक दुसऱ्याकडून पैसे घेऊन माझा छळ करीत आहे. मला न्याय देण्याऐवजी तो दुसऱ्या एका व्यक्तीच्या सांगण्यावरून कृती करतो आहे. मी किती वेळा विनंती केली तरीही नोंद लावलेली नाही. त्यांनी प्रशासनाला विनंती केली आहे की ग्रामसेवकाने तातडीने मृत्यू नोंद लावून द्यावी किंवा माझा नवरा ग्रामसेवकाने आणून द्यावा, अन्यथा पंचायत समितीच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

"याला सर्वस्वी ग्रामसेवक जबाबदार आहे, मी आता शेवटचा पर्याय म्हणून उपोषण करणार," असे कल्पना अशोक काळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले आहे.



कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टीयांचे कार्यालय
(दंड -विभाग)
ता.आष्टी जि.बीड
Email id-tahsildarashti@gmail.com दूरध्वनी क्र.(02441) 282542

आदेश

प्रतिलिपी,
1. ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत बाळेवाडी ता.आष्टीजि.बीड यांना अनुपालनार्थ.

सीना धरणाच्या पाण्यासाठी बसवलेल्या मोटारींचे केबल व स्टार्टर चोरीला; पाच शेतकऱ्यांचे नुकसान — चोरट्यांवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी । कडा

तालुक्यातील बाळेवाडी घाट परिसरात सीना धरणावरून शेतीसाठी पाणी आणण्यासाठी बसवलेल्या मोटारींचे केबल व स्टार्टर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. या चोरीत पाच शेतकऱ्यांवर अन्याय झाला असून*त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

बाळेवाडी परिसरातील पाच शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सीना धरणातून शेतीला पाणी आणण्यासाठी पाईपलाईन व मोटारी बसवल्या होत्या. शेतात पाणी उपसण्यासाठी प्रत्येकाने मोटारीला केबल व स्टार्टर बसवले होते.

रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी या पाचही मोटारींचे केबल व स्टार्टर चोरून नेले आहेत. सकाळी शेतात गेल्यावर हा प्रकार उघडकीस आला.

या चोरीमुळे प्रत्येक शेतकऱ्याचे 15 ते 20 हजार याप्रमाणे एकूण सुमारे 1 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. पिकाला पाणी देण्याच्या वेळीच चोरी झाल्याने शेतकऱ्यांचे हाल होत आहेत.

या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात येणार असून चोरट्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी पाचही पीडित शेतकऱ्यांनी केली आहे.

लोकार्थ

हीरो मोटर्सचा आयपीओ १६ सप्टेंबर, २०२६ रोजी खुला होणार

हीरो मोटर्स लिमिटेडने आपल्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी (आयपीओ) प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरमागे ७९ रुपये ते ८४ रुपये असा किंमत पट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव वर्गणीसाठी बुधवार, १६ सप्टेंबर, २०२६ रोजी खुला होईल आणि शुक्रवार, १८ सप्टेंबर, २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १७८ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १७८ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.

हा आयपीओ म्हणजे प्रवर्तक ओ पी मुंजाल होल्डिंग्ज आणि हीरो सायकल्स लिमिटेड यांच्याकडून ६०० कोटी रुपयांपर्यंतचा नवीन इश्यू आणि ४०० कोटी रुपयांपर्यंतच्या इक्विटी शेअर्सच्या विक्रीचा (ऑफर-फॉर-सेल) एक संयुक्त प्रस्ताव आहे.या नवीन इश्यूमधून मिळणाऱ्या १९० कोटी रुपयांच्या निधीचा वापर कंपनीने घेतलेल्या काही थकीत कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्व-परतफेड/विमोचन करण्यासाठी, २०० कोटी रुपयांचा वापर कंपनीच्या सुविधेच्या क्षमता विस्तारासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करून भांडवली खर्चासाठी,केला जाईल

नवनीत फाऊंडेशन'च्या शिक्षक प्रशिक्षण उपक्रमाची दशकपूर्ती

शिक्षकांना ज्ञान, कौशल्ये, नवनवीन अध्यापन पद्धती आणि सकारात्मक दृष्टीकोन देऊन अधिक सक्षम करावे, त्यांच्यामार्फत शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढावी, यासाठी 'नवनीत फाऊंडेशन'तर्फे हाती घेतलेल्या शिक्षक प्रशिक्षण उपक्रमाने आपली १० वर्षे पूर्ण केली आहेत. 'नवनीत फाउंडेशन'ने सामाजिक उत्तरदायित्व म्हणून जून २०१६ मध्ये शिक्षक प्रशक्षण उपक्रमाची स्थापना केली होती. 'नवनीत'चे संचालक श्री. अनिल गाला यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या

या उपक्रमाचे नेतृत्व माजी शिक्षणाधिकारी श्रीमती बसंती रॉय गेली १० वर्षे यशस्वीपणे करत आहेत. कृतिपत्रिका, गणित, इंग्रजी, मराठी, स्कॉलरशिप परीक्षा, NEP- २०२० आणि शालेय नेतृत्व अशा अत्यंत गरजेच्या विषयांवर 'नवनीत'तर्फे मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिक, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर, अमरावती, अकोला, जळगाव, धुळे आणि नंदूरबार अशा महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांत सातत्याने विनामूल्य प्रशिक्षणे आयोजित केली जातात. आतापर्यंत सुमारे ६७० कार्यशाळांच्या माध्यमातून ३५ हजार शिक्षकांना समृद्ध करण्याचे कार्य या उपक्रमाने केले आहे. सध्या बदललेल्या नव्या पाठ्यपुस्तकांवर आधारित प्रशिक्षण सत्रे घेण्यात येत आहेत. या प्रशिक्षणांचा लाभ अनुदानित तसेच विनाअनुदानित शाळांच्या शिक्षकांनाही होतो.

भारतातील एमएसएमई कर्जाची तूट ६० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त

भारताने आपल्या व्यावसायिक परिसंस्थेतील जवळपास प्रत्येक घटकाचे स्वतंत्रपणे डिजिटायझेशन आणि मानकीकरण केले आहे, परंतु विविध प्लॅटफॉर्मवरील कनेक्टिव्हिटी आणि माहितीच्या प्रवाहातील त्रुटींमुळे अकार्यक्षमता निर्माण होत आहे आणि भांडवलाच्या उपलब्धतेवर मर्यादा येत आहेत, ज्यामुळे एमएसएमईच्या वाढीवर अधिक परिणाम होत आहे.ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या, बेन अँड कंपनी आणि एनपीसीआय भारत बिलपे लिमिटेड यांच्या 'इंडियाज नेक्स्ट ग्रोथ फ्रंटियर: बी२बी कॉमर्स, पेमेंट्स, अँड क्रेडिट' शीर्षकाच्या नवीन अहवालात, भारतातील व्यवसाय प्रणाली, पेमेंट प्रदाते, बँका, वित्तपुरवठादार आणि सार्वजनिक प्रणालींमधील बी२बी कार्यप्रवाह एका केंद्रीकृत, आंतरकार्यक्षम डिजिटल प्रणालीद्वारे अखंडपणे कसे जोडले जाऊ शकतात आणि त्यामुळे भारतीय व्यवसायांसाठी कार्यात्मक कार्यक्षमता व पतपुरवठ्याची उपलब्धता कशी वाढवता येईल, याचे परीक्षण केले आहे."डिजिटल पेमेंटच्या प्रसारात भारताने लक्षणीय प्रगती केली आहे, तरीही व्यवसाय प्रणाली, पेमेंट प्रदाते, बँका, वित्तपुरवठादार आणि सार्वजनिक प्रणालींमधील अनेक बी२बी कार्यप्रवाह मोठ्या प्रमाणात विखुरलेले आहेत. ही एक अशी दरी आहे जी भारतातील व्यवसाय आणि एमएसएमई वर परिणाम करते," असे बेन अँड कंपनीचे पार्टनर आणि इंडिया हेड ऑफ फायनान्शियल सर्व्हिसेस प्रॅक्टिस, श्री. सौरभ ग्रेहान म्हणाले.Rep

ब्रिजस्टोन इंडिया मोबिलिटी सोशल इम्पॅक्ट अॅवॉर्ड्स 2026 चे विजेते घोषित

ब्रिजस्टोन इंडियाच्या मोबिलिटी सोशल इम्पॅक्ट अॅवॉर्ड्स 2026 च्या 6व्या आवृत्तीत महाराष्ट्रातील 3 स्वयंसेवी संस्थांना समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले. असुरक्षित समुदायांच्या सक्षमीकरणात गतिशीलता या श्रेणीत विजेते ठरलेले अनुभूती चॅरिटेबल ट्रस्ट ही महिलांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेली एक स्वयंसेवी संस्था असून, महाराष्ट्रातील भटक्या, विमुक्त आणि आदिवासी समुदायांसाठी काम करते. शिक्षण आणि नेतृत्व विकासाच्या माध्यमातून कुटुंबात शिक्षण घेणाऱ्या पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांना सक्षम करण्यावर ही संस्था विशेष भर देते. दुर्गम भागातील मुले आणि युवकांना शिक्षणाची सुविधा अधिक सुलभ करून देण्यासोबतच, संस्था मानसिक आरोग्य सहाय्य, करिअर मार्गदर्शन, लैंगिक न्यायाबाबत जनजागृती, आपत्तीप्रतिकारक क्षमता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण आणि सांस्कृतिक सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवते. आजपर्यंत अनुभूतीने प्रशिक्षण, समुपदेशन, शिष्यवृत्ती, फेलोशिप आणि जनजागृती कार्यक्रमांच्या माध्यमातून 8 लाखांहून अधिक व्यक्तींच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पाडला आहे. 45 हून अधिक संस्थांसोबतच्या भागीदारीद्वारे, ही संस्था विविध महानगरपालिका आणि ग्रामीण भागांमधील 600 हून अधिक युवकांशी नियमितपणे संपर्क साधते.केवळ या प्रकल्पामुळेच 1,000 हून अधिक मुले आणि युवकांना मदत मिळाली आहे. यामध्ये 100% शिक्षण सुरू ठेवण्याचा दर साध्य झाला असून, 90% जणांना व्यसनमुक्त राहण्यास मदत झाली आहे. अनेक सहभागी आता त्यांच्या समुदायातून उच्च शिक्षण घेणारे आणि विविध शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांमध्ये संधी मिळवणारे पहिले विद्यार्थी ठरले आहेत.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
बीड, सोमवार, १४ सप्टेंबर 2026

गणपती प्रतिष्ठापनेचा पहिला शुभ मुहूर्त सकाळी ११:२० ते दुपारी १:४७वाजेपासून, जाणून घ्या पूजेची पद्धत आणि मंत्र

आज दिनांक २७ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थी आहे. आज चित्रा नक्षत्र, बुधवार आणि भाद्रपद महिन्यातील चतुर्थी तिथी हे शुभ संयोग निर्माण करत आहेत. गणेश पुराणात असे म्हटले आहे की, अशाच एका योगात, देवी पार्वतीने दुपारी गणपतीची मूर्ती बनवली, ज्यामध्ये महादेवाने प्राण ओतले. या खास दिवशी गणपतीची स्थापना करण्यासाठी दोन शुभ मुहूर्त असतील.

भाद्रपद महिन्यातील या गणेश चतुर्थीला सिद्धिविनायकाच्या रूपात गणपतीची पूजा करण्याची प्रथा आहे. या रूपाची पूजा भगवान विष्णूने केली होती आणि त्यांना हे नाव देखील देण्यात आले होते.

प्रत्येक शुभ कार्यापूर्वी गणेशजींच्या सिद्धिविनायक रूपाची पूजा केली जाते. असे मानले जाते की गणेशजींचे हे रूप सुख आणि समृद्धी देते. त्यांची पूजा केल्याने प्रत्येक कामात यश मिळते. म्हणूनच त्यांना सिद्धिविनायक म्हणतात.

सिद्धिविनायक रूप: लाल रंग, बसलेले गणेश आणि हातात रुद्राक्षाची माळ

सिद्धिविनायक रूपाची मूर्ती लाल रंगाची आहे. ही बसलेली गणेशमूर्ती आहे. या मूर्तीच्या डोक्यावर मुकुट आणि गळ्यात हार आहे. उजवा दात तुटलेला आहे आणि डावा पूर्ण आहे. नागाचे पवित्र जानवे घातलेले आहे. एक हात आशीर्वाद देत आहे, दुसऱ्या हातात मोदक आणि रुद्राक्षाची माळ आहे. तिसऱ्या हातात अंकुश (शस्त्र) आहे. चौथ्या हातात फास आहे.

गणेशाच्या जन्माशी संबंधित पुराणातील कथा

शिवपुराण: देवी पार्वतीने तिच्या शरीरातील मातीपासून गणेशाची निर्मिती केली

स्नान करण्यापूर्वी, देवी पार्वतीने तिच्या शरीरातील मातीपासून एका मुलाचा पुतळा बनवला आणि त्यात जीवन फुंकले. देवीने त्याला द्वारपाल बनवले आणि कोणीही आत येऊ नये अशी आज्ञा दिली. शिव आल्यावर तो मुलगा त्यांना थांबवतो. शिव आणि त्या मुलामध्ये भांडण होते. शिव आपल्या त्रिशूळाने मुलाचे डोके कापतात. मुलाला पाहून पार्वती दुःखी होते. तिच्या क्रोधापासून विश्वाला वाचवण्यासाठी, मुलाच्या शरीरावर हत्तीचे डोके ठेवले जाते आणि त्याला पुन्हा जीवन दिले जाते. शिव मुलाला गजानन नाव देण्याचे आणि त्याची प्रथम पूजा केली जाईल असे वरदान देतात.

लिंग पुराण: भगवान शिव यांनी श्रीगणेशाला प्रकट केले, ज्याला विघ्नेश्वर म्हटले जाते देवगण बृहस्पतींसह शिवाला प्रार्थना करतात की त्यांना अशा देवाचे रूप द्यावे जे अधर्मींच्या कार्यात अडथळे निर्माण करू शकेल आणि सज्जनांना आनंदी करू शकेल. त्यानंतर शिव यांनी गणेश्वरला प्रकट केले. पार्वतीने त्यांना गजाननाचे रूप दिले. शिव पुत्रजन्माचे विधी करतात आणि वरदान देतात की तिन्ही लोकात प्रथम पूजा होईल. तसेच, तुम्हाला विघ्नेश्वर आणि विनायक म्हणून ओळखले जाईल. तुमचे गण अधर्मींच्या कार्यात अडथळे निर्माण करतील. त्यानंतर गणेश आपले विघ्न-गण स्थापित करतात.

MH-CET घोटाळा:मुख्यमंत्र्यांकडून ऑडिट-FIR चे आश्वासन, परीक्षा ऑफलाईन घ्यायला भाग पाडूच : रोहित पवारांचा इशारा

मुंबई : गेल्या महिनाभरापासून राज्यात गाजत असलेल्या MH-CET परीक्षेतील घोळाबाबत अखेर राज्य सरकारने एक पाऊल मागे घेत महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणी आक्रमक भूमिका घेत पाठपुरावा सुरू ठेवला होता. त्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी CET निकालाचे आणि संबंधित कंपनीचे फॉरेन्सिक ऑडिट (Forensic Audit) करण्याचा, तसेच डेटा लीक प्रकरणी FIR दाखल करण्याचा शब्द दिला असल्याची माहिती रोहित पवार यांनी दिली आहे.

फॉरेन्सिक ऑडिट आणि FIR चे आश्वासन

या बैठकीनंतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर माहिती देताना रोहित पवार म्हणाले की, "गेल्या महिनाभरापासून आम्ही CET मधील घोळाचा विषय लावून धरला होता. अखेर मुख्यमंत्र्यांनी निकालाचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याचा शब्द शिष्टमंडळाला दिला आहे." डेटा लीक प्रकरणावर बोलताना त्यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांच्या गोपनीय डेटा लीक प्रकरणी आम्ही चार-पाच तास पोलीस स्टेशनला बसून राहिलो होतो, पण तेव्हा पोलिसांनी FIR दाखल करून घेतला नव्हता. मात्र, आता मुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी FIR दाखल करण्याचाही शब्द दिला आहे."

'एज्युस्पार्क' वरील कारवाई आणि ऑफलाईन परीक्षेवर नाराजी

मुख्यमंत्र्यांनी दोन मागण्या मान्य केल्या असल्या, तरी रोहित पवार यांनी काही मुद्द्यांवरून नाराजी व्यक्त केली आहे. CET निकालाचे ऑडिट करताना 'एज्युस्पार्क' (EduSpark) कंपनीचे फॉरेन्सिक ऑडिट करण्यास मुख्यमंत्र्यांनी होकार दिला आहे. मात्र, या कंपनीने टेंडरमध्ये केलेल्या कार्टेलसंदर्भात (Cartel) कारवाई करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी कोणतेही भाष्य केलेले नाही. यासोबतच, विद्यार्थ्यांच्या हितासाठी येणारी CET परीक्षा ऑफलाईन घेण्याबाबतही सरकारने अद्याप कुठलीही ठोस भूमिका मांडलेली नाही, यावर पवारांनी खंत व्यक्त केली.

२ ते ३ दिवसांचा अल्टिमेटम

"एज्युस्पार्कवर कारवाई करायला आणि CET परीक्षा ऑफलाईन घ्यायला आम्ही येत्या काळात सरकारला भाग पाडूच," असा ठाम विश्वास रोहित पवार यांनी व्यक्त केला आहे. तसेच, दिलेल्या शब्दाप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी पुढील दोन-तीन दिवसांत निकालाचे फॉरेन्सिक ऑडिट आणि डेटा लीक प्रकरणात FIR या दोन प्रमुख मागण्यांवर आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव : भक्तीसोबत निसर्गाचीही काळजी

आजपासून महाराष्ट्रात गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे. गणरायाच्या स्वागतासाठी घरोघरी आणि सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये तयारी पूर्ण झाली असून सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. श्रद्धा, परंपरा, कला आणि सामाजिक एकोपा यांचा संगम असलेला गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मात्र उत्सवाचा आनंद साजरा करताना त्याचा पर्यावरणावर होणारा परिणामही लक्षात घेणे आवश्यक आहे. गणेशमूर्ती, सजावट, निर्माल्य, प्लास्टिकचा कचरा, ध्वनिप्रदूषण आणि विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण या प्रश्नांकडे उत्सव संपल्यानंतर लक्ष देण्यापेक्षा सुरुवातीपासूनच त्यासाठी योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव म्हणजे उत्सवाचा उत्साह कमी करणे किंवा परंपरांना बाजूला ठेवणे नव्हे. आपल्या श्रद्धा आणि परंपरा जपत निसर्गाप्रतीची जबाबदारी पार पाडणे हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे. गणरायाचे आगमन ज्या उत्साहाने करतो, त्याच जबाबदारीने विसर्जनही केले, तर उत्सवाचे सामाजिक आणि पर्यावरणीय महत्त्व अधिक वाढेल. म्हणूनच यंदाच्या गणेशोत्सवात केवळ पर्यावरणपूरकतेची चर्चा न करता काही ठोस कृती करण्याचा संकल्प करूया.

डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.

१. गणेशमूर्ती खरेदी करताना शक्यतो शाडू मातीची मूर्ती निवडावी. मूर्तीचा आकारही आपल्या घरातील किंवा मंडपातील जागा आणि विसर्जनाची उपलब्ध व्यवस्था लक्षात घेऊन ठरवावा.

२. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीऐवजी पर्यावरणपूरक पर्याय निवडावा. मूर्ती खरेदी करण्यापूर्वी ती कोणत्या साहित्यापासून तयार केली आहे, याची माहिती घ्यावी.

३. मूर्ती रंगविण्यासाठी आणि सजावटीसाठी शक्यतो नैसर्गिक किंवा पर्यावरणाला कमी हानी पोहोचविणारे रंग वापरावेत. आकर्षकतेपेक्षा पर्यावरणीय परिणामाला महत्त्व द्यावे.

४. घरगुती गणेशमूर्तीचे शक्य असल्यास घरच्या घरी विसर्जन करावे. त्यासाठी योग्य आकाराचे भांडे वापरून विसर्जनानंतरचे पाणी व माती योग्य पद्धतीने वापरावी.

५. सार्वजनिक विसर्जनासाठी प्रशासनाने निश्चित केलेल्या ठिकाणांचाच वापर करावा. उपलब्ध असल्यास कृत्रिम विसर्जन कुंडांचा वापर करून नैसर्गिक जलस्रोतांवरील ताण कमी करावा.

६. नदी, तलाव, समुद्र किंवा अन्य जलस्रोतांमध्ये मूर्तीबरोबर पूजासाहित्य, प्लास्टिक किंवा सजावटीचे साहित्य टाकू नये. विसर्जनाच्या वेळी पाण्यात अनावश्यक वस्तू जाणार नाहीत, याची प्रत्येकाने स्वतः काळजी घ्यावी.

७. निर्माल्य पाण्यात टाकण्याऐवजी त्यासाठी स्वतंत्र डबा ठेवावा. घरातील आणि मंडपातील निर्माल्य स्थानिक प्रशासन किंवा गणेश मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या संकलन केंद्रात जमा करावे.

८. गणेश मंडळांनी संकलित निर्माल्यापासून कंपोस्ट किंवा सेंद्रिय खत तयार करण्याचा उपक्रम राबवावा. अशा उपक्रमातून उत्सवातील कचरा कमी होण्याबरोबरच त्याचा पुन्हा उपयोगही करता येईल.

९. गणेशोत्सवात एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तू टाळाव्यात. प्लास्टिकच्या पिशव्या, कप आणि प्लेट्सऐवजी कापडी पिशव्या व पुनर्वापर करता येणारी भांडी वापरावीत.

१०. मंडप आणि सजावटीमध्ये थर्माकोलचा वापर टाळावा. कापड, कागद, बांबू, लाकूड किंवा अन्य पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याचा वापर करावा.

११. दरवर्षी नवी सजावट करण्याऐवजी मागील वर्षीचे साहित्य दुरुस्त करून पुन्हा वापरावे. यामुळे खर्च कमी होईल आणि उत्सवानंतर निर्माण होणारा कचरा देखील कमी होईल.

१२. प्रत्येक गणेश मंडपात ओला आणि सुका कचरा वेगळा करण्यासाठी स्वतंत्र डबे ठेवावेत. कचरा वेळेवर जमा करून तो योग्य ठिकाणी देण्याची जबाबदारी स्वयंसेवकांकडे सोपवावी.

१३. मंडपातील विद्युत वापराचे नियोजन करावे. अनावश्यक रोषणाई टाळावी, ऊर्जा-बचत करणारे दिवे वापरावेत आणि कार्यक्रम संपल्यानंतर प्रकाशयोजना बंद करण्याची जबाबदारी निश्चित व्यक्तीकडे द्यावी.

१४. ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी गणेश मंडळांनी स्वतःची स्पष्ट आचारसंहिता ठरवावी. ध्वनिक्षेपकाचा वापर लागू असलेल्या वेळा आणि ध्वनिमर्यादेनुसारच करावा.

१५. ढोल-ताशे, लेझीम आणि अन्य पारंपरिक कलांना प्रोत्साहन द्यावे. मात्र त्यांचे सादरीकरण करताना ध्वनीची मर्यादा आणि लागू असलेल्या नियमांचे पालन करावे.

१६. प्रत्येक गणेश मंडळाने आपल्या मंडपाच्या परिसराची स्वच्छता स्वतःची जबाबदारी मानावी. दररोज कचरा संकलनासाठी स्वयंसेवकांच्या पाळ्या निश्चित कराव्यात आणि कार्यक्रमानंतर परिसर स्वच्छ करावा.

१७. प्रत्येक मंडळाने गणेशोत्सवाच्या काळात किमान एक पर्यावरण जनजागृती उपक्रम राबवावा. माहितीफलक, प्रदर्शन, व्याख्यान किंवा सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून जलप्रदूषण, प्लास्टिकमुक्ती आणि स्वच्छतेचा संदेश द्यावा.

१८. गणेशोत्सवाच्या निमित्ताने केवळ वृक्षारोपण न करता वृक्षसंवर्धनाची जबाबदारी घ्यावी. लावलेल्या झाडाला नियमित पाणी देणे, त्याचे संरक्षण करणे आणि त्याची देखभाल करणे यासाठी जबाबदारी निश्चित करावी.

१९. विसर्जनासाठी जाताना 'काहीही मागे सोडणार नाही' हा संकल्प करावा. निर्माल्य, पूजासाहित्य आणि अन्य कचरा स्वतंत्रपणे जमा करावा आणि विसर्जनस्थळी कोणताही कचरा सोडू नये.

२०. यंदाच्या गणेशोत्सवात प्रत्येक कुटुंबाने किंवा गणेश मंडळाने किमान पाच पर्यावरणपूरक कृती प्रत्यक्ष राबविण्याचा संकल्प करावा. उत्सव संपल्यानंतर त्या कृतींचा आढावा घेऊन पुढील वर्षासाठी अधिक प्रभावी नियोजन करावे.

गणेशोत्सवाचा उत्साह आणि भक्ती अबाधित ठेवत पर्यावरणाची जबाबदारी स्वीकारणे ही आजची गरज आहे. पर्यावरणपूरक उत्सवासाठी मोठ्या घोषणा करण्यापेक्षा प्रत्येक घराने आणि प्रत्येक गणेश मंडळाने आपल्या पातळीवर केलेली छोटी कृती अधिक महत्त्वाची आहे. मूर्तीची निवड, सजावट, निर्माल्य व्यवस्थापन, प्लास्टिकचा वापर, ध्वनिप्रदूषण, कचरा व्यवस्थापन आणि विसर्जन या प्रत्येक टप्प्यावर आपण घेतलेला निर्णय पर्यावरणासाठी परिणामकारक ठरू शकतो.

गणरायाचे स्वागत करताना आपल्या नद्या, तलाव, समुद्र आणि परिसराचेही संरक्षण करूया. भक्ती निसर्गाच्या विरोधात नाही; निसर्गाचे रक्षण करण्याची जाणीव हीच आपल्या भक्तीला अधिक व्यापक अर्थ देते. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव केवळ आनंदाचा आणि श्रद्धेचा उत्सव न राहता पर्यावरणसंवर्धनाची सामूहिक कृती ठरवूया. गणरायाच्या आगमनाबरोबर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी पर्यावरणाचा संकल्प करूया.

गणपती बाप्पा मोरया!

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करूया!